**<u>ठळक बातम्या</u>**

- मुंबई-गोवा महामार्गाचं काम येत्या तीन महिन्यात पूर्ण करण्याची केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची ग्वाही / कोलाड-माणगाव दरम्यानच्या बायपाससाठी राज्य सरकारकडून सुमारे २२ कोटी रुपयांचा निधी

- मांसाहारबंदीचा आदेश महायुती सरकारचा नाही, लोकांचं अन्न ठरवण्यात सरकारला रस नसल्याचं मुख्यमंत्र्यांचं स्पष्टीकरण

- मुंबईतले कबुतरखाने बंद करायच्या महानगरपालिकेच्या निर्णयाला स्थगिती द्यायला मुंबई उच्च न्यायालयाचा नकार

- व्यावसायिक खेळाडूंना मिळणारे लाभ पारंपरिक देशी खेळाडूंना देण्यासाठी प्रयत्न करण्याचं क्रीडा मंत्र्यांचं आश्वासन

**आणि**

- विदर्भ आणि मराठवाड्याच्या काही भागात येत्या २ दिवसात मुसळधार पावसाची शक्यता

**<><><><><>**

मुंबई-गोवा महामार्गाचं काम युद्धपातळीवर सुरू असून येत्या तीन महिन्यात हा महामार्ग पूर्ण होईल, अशी ग्वाही केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज वार्ताहर परिषदेत दिली. या महामार्गाच्या रखडलेल्या कामाबाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आज रास्तारोको केलं. त्यानंतर बावनकुळे यांनी माजी आमदार वैभव नाईक यांच्याशी चर्चा करून गडकरी यांच्याशी त्यांचं बोलणं करून दिलं.

गणेशोत्सवादरम्यान मुंबई-गोवा महामार्गावरून कोकणात जाणाऱ्या लाखो गणेशभक्तांची गैरसोय होऊ नये, यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज

बैठक घेऊन कोलाड ते माणगाव दरम्यानच्या सर्व बायपाससाठी २१ कोटी ९० लाख रुपयांची तरतूद करायचा निर्णय घेतला. खासदार सुनील तटकरे, अधिकारी आणि मुंबई-गोवा महामार्ग जनआक्रोश समितीचे पदाधिकारी या बैठकीला उपस्थित होते. दरम्यान, या बैठकीनंतर मुंबई-गोवा महामार्ग जनआक्रोश समितीच्या पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त करून आंदोलन मागे घेण्याची ग्वाही दिली.

<><><><><>

राज्यात मांसाहारबंदी करायचा आदेश आपल्या सरकारनं काढलेला नाही, कुणी काय खावं हे ठरवण्यात राज्य सरकारला काहीही रस नसून सरकारपुढे इतर बरेच प्रश्न आहेत, हा शासन आदेश १९८८ मध्ये काढलेला आहे, असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मांसाहार बंदीबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मांडलं. आयबीएमच्या मुंबईतल्या कार्यालयाचं उद्घाटन केल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. क्वांटम कॉंप्युटिंग क्षेत्राचा प्रभावी वापर करण्याच्या दृष्टीनं राज्य सरकारनं आयबीएमशी सामंजस्य करार केल्याची आणि याद्वारे शेती, दळणवळण, आरोग्य सुविधा, आपत्ती व्यवस्थापन, संरक्षण इत्यादी क्षेत्रांमध्ये शाश्वत विकासाधारित विकास कसा करता येतील, तसंच क्वांटम कॉंप्युटिंग क्षेत्रात मनुष्यबळ कसं विकसित करता येईल, यासंदर्भात आयबीएमसोबत राज्य सरकार काम करणार असल्याचंही फडणवीस यांनी नमूद केलं.

<><><><><>

राज्य शासनाने गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिला आहे. ऑपरेशन सिंदूरद्वारे भारतानं जगाला दाखवून दिलेली शक्ती आणि स्वदेशी वस्तूंच्या वापराबाबत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी जनजागृती करावी, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केलं. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा सुव्यवस्थेबाबत मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात बैठक झाली. ईद-ए-मिलादचा सणही गणेशोत्सवादरम्यान येत असल्याने धार्मिक सौहार्द

कायम ठेवून कुठेही कायदा सुव्यवस्था बिघडणार नाही याची दक्षता घ्यावी, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी प्रशासनाशी समन्वय राखून हा गणेशोत्सव शांतता आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करावा, असंही फडणवीस यांनी यावेळी सांगितलं. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांप्रमाणेच मूर्तीकारांनाही सलग पाच वर्षं परवानगी देण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

**<><><><><>**

कबुतरांच्या विष्ठेमुळे मानवी आरोग्याला धोका निर्माण होत असल्यामुळे मुंबईतले कबुतरखाने बंद करण्याच्या महानगरपालिकेच्या निर्णयाला स्थगिती द्यायला मुंबई उच्च न्यायालयाने आज नकार दिला. या प्रकरणाची पुढची सुनावणी २० ऑगस्टला होईल. तोपर्यंत, यासंदर्भात शिफारशी करण्यासाठी महानगरपालिकेनं तज्ज्ञांची समिती नेमावी, असे निर्देश न्यायालयानं दिले. मुंबईत ब्रिटीश काळात बांधले गेलेले कबुतरखाने ऐतिहासिक वास्तू असल्याने ते पाडू नयेत, असंही न्यायालयानं सांगितलं.

दरम्यान कबुतरखाने बंद करण्याच्या महानगरपालिकेच्या निर्णयाला पाठिंबा दर्शवण्यासाठी आज मराठी एकीकरण समितीनं दादरमध्ये आंदोलन केलं.

या प्रश्नाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली.

***होल्ड... बाइट- देवेंद्र फडणवीस (२२ सेकंद)***

**<><><><><>**

देशातली २८ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून २१० पंचायत प्रतिनिधींना नवी दिल्लीत होणाऱ्या यंदाच्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. यात राज्यातल्या १५ सरपंचांचा समावेश असून यात ९ महिला सरपंच आहेत. आपापल्या गावात पायाभूत सुविधा, सार्वजनिक सेवा, आणि सामूहिक उपक्रम राबवून सुधारणा घडवणाऱ्या सरपंचांना विशेष पाहुणे म्हणून आमंत्रण देण्यात आलं आहे. यात महिला प्रतिनिधींची संख्या लक्षणीय आहे. हर घर

नल जल योजना, प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना आणि इंद्रधनुष अभियानात या प्रतिनिधींनी भरीव कार्य केलं असल्याचं पंचायती राज मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><>

पारंपरिक देशी खेळाडूंना शिवछत्रपती पुरस्कार, शासकीय लाभ आणि नियुक्त्या देण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करू, असं आश्वासन क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज दिलं. मुंबईत ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव पारंपरिक देशी क्रीडा महाकुंभाच्या उद्घाटनात ते बोलत होते. येत्या २२ ऑगस्टपर्यंत हा क्रीडा महाकुंभ चालणार असून २० हजार स्पर्धक १८ विविध देशी खेळांची मैदानं गाजवणार आहेत. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यासह इतर यावेळी उपस्थित होते.

<><><><>

राज्य मार्ग परिवहन महामंडळाचं ६ प्रादेशिक विभागामध्ये विभाजन करण्यात आलं असून ६ वा विभाग नाशिक इथं निर्माण करायला एसटी महामंडळानं परवानगी दिल्याचं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितलं. एसटी महामंडळाच्या मुख्यालयात ७० उमेदवारांना अनुकंपा तत्वावर नोकरीचं नियुक्तीपत्र देण्याचा कार्यक्रम आज झाला त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

<><><><>

बालविवाह प्रथा समुळ नष्ट करण्याच्या दृष्टीने शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे, अशी माहिती महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. यासंदर्भात युनिसेफ सोबत मुंबईत झालेल्या बैठकीत त्या बोलत होत्या. ज्या राज्यात बालविवाह रोखण्यासाठी अभियान यशस्वी ठरले आहे, अशा राज्यांचा अभ्यास करून अहवाल सादर करण्याचे निर्देशही यावेळी दिले.

<><><><>

राज्यात आतापर्यंत २५ जिल्ह्यांमध्ये ९ हजार ८२० जनावरांना लम्पी रोगाची लागण झाली असून, ३३९ जनावरांचा मृत्यू झाला आहे. रोगाला प्रतिबंध घालण्यासाठी सुमारे ९३ टक्के जनावरांना लस देण्यात आली असल्याची माहिती पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी दिली.

**<><><><><>**

देशासह राज्यात विविध ठिकाणी हर घर तिरंगा अभियान राबवण्यात येत आहे. राज्याचे बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगरमध्ये या अभियानाला सुरुवात झाली. मराठवाडा मुक्ती संग्राम स्मारकाला अभिवादन करून सावे यांनी तिरंगा फडकवला. शहर भाजपानं तिरंगा रॅली काढली.

**परभणी** इथंही सायकल रॅली काढण्यात आली. **धुळे** महापालिकेनं आज आयोजित केलेल्या तिरंगा बाइक रॅलीदरम्यान सहभागींनी देशभक्तीपर घोषणा आणि गीतांनी नागरिकांचं लक्ष वेधून घेतलं. कारंजा तालुक्यात जिल्हा परिषद शाळेनं आज स्वच्छता जनजागरण प्रभात फेरी काढली. **पालघर** शहरात तिरंगा ट्रिब्यूट अंतर्गत पाच माजी सैनिकांचा सत्कार नगरपरिषदेनं केला. **रत्नागिरी** पोलीस दलानं आज अमली पदार्थमुक्त रत्नागिरी दौड आयोजित केली. तसंच भाट्ये किनाऱ्यावर स्वच्छता मोहीमही राबवण्यात आली. हर घर तिरंगा अभियानांतर्गत **सांगली, मिरज, कुपवाड** शहर महानगरपालिकेनं सर्व शाळांमध्ये विविध स्पर्धा घेतल्या. **पनवेल** महापालिकेनेही आज सर्व शाळांमध्ये ध्वजारोहण केलं आणि विविध स्पर्धा आयोजित केल्या.

**<><><><><>**

विदर्भ आणि मराठवाड्याच्या काही भागात येत्या २ दिवसात मुसळधार पावसाची शक्यता आहे. **परभणी, हिंगोली, नांदेड, वाशिम, अमरावती,**

**यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर** आणि **गडचिरोलीमध्ये** मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट हवामान विभागानं दिला आहे.

कोयना धरणातून रात्री ७ ते ९ दरम्यान २ हजार ९०० क्युसेक विसर्ग होणार आहे.

**यवतमाळमध्ये** पहाटेपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळं ईसापूर धरणाचे तीन दरवाजे ५० सेंटिमीटरने उघडण्यात आले आहे. धरणातून सुमारे ५ हजार क्यूसेक विसर्ग पैनगंगा नदी पात्रात सुरू आहे. यामुळं यवतमाळ जिल्ह्यातल्या पुसद, उमरखेड, महागांव आणि नांदेड जिल्ह्यातल्या पैनगंगा नदी काठावरच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा प्रशासनानं दिला आहे.

**सांगली** शहरासह मिरज, पलूस, तासगाव आणि वाळवा तालुक्यात दुपारी जोरदार पाऊस झाल्यानं जनजीवन विकसित झालं. **भंडारा** जिल्ह्यात मोठ्या विश्रांतीनंतर आज सकाळी पावसाचं आगमन झालं. यामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. **नाशिकमध्येही** पावसानं आज पुनरागमन केलं.

**//<><><><><>//**